*Dr. Kirit Somaiya*
**B.Com, FCA, Ph.D.**
**Ex-Member of Parliament**
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

नोव्हेंबर १२, २००८

## मतदार याद्यांमध्ये बोगस-बांगलादेशी मतदार

बोगस बांगलादेशी मतदारांना मतदार याद्यांमध्ये स्थान मिळू लागले आहे. बीएआरसी च्या शास्त्रज्ञांच्या हाउसिंग सोसायटीत अशी बोगस बांगलादेशी मतदारांची नावे आढळून आल्याबद्दल भाजप नेता डॉ. किरीट सोमैय्या यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

रोहिणी ही वाशी सेक्टर ९ मधील अशीच एक हाउसिंग सोसायटी आहे जी आता बेलापूर मतदार संघाचा हिस्सा आहे. पात्र मतदारांची संख्या सुमारे ६० आहे. ही सोयायटी बीएआरसीच्या शास्त्रज्ञांची आहे.

निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मतदार याद्यांमध्ये बोगस बांगलादेशी मतदारांची नावे आढळून आली आहेत. सोसायटीचे सदस्य असलेल्या शास्त्रज्ञ रहिवाशांनी, ज्यांच्यापैकी एक सोसायटीचा सेक्रेटरी आहे, वारंवार विनंती करूनसुद्धा, याबाबत आतपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

१५१ बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या नुकत्याच प्रसिध्द करण्यात आलेल्या मतदार यादीच्या भाग क्र. १७ मध्ये रोहिणी सोसायटीच्या एकाही सदस्याचे नाव नाही, त्याऐवजी त्यांच्या जागी ९७ बोगस बांगलादेशी मतदारांची नावे घुसडण्यात आली आहेत. भाग क्र. १७ च्या अनुक्रमांक २८० वर अत्तार रुकसाना पासून अनुक्रमांक ३७६ वरच्या कोया हसन पर्यंत सर्व बोगस बांगलादेशी मतदार आहेत.

डॉ. किरीट सोमैय्यांनी निवडणूक आयोगाला परत एकदा विनंती केली आहे कि बोगस बांगलादेशी मतदारांची नावे काढून टाकण्यासाठी आणि मतदार यादीतील यापुढील घुलखोरीला आळा घालण्यासाठी कडक कारवाई करावी.

***प्रसिद्धी सचिव***

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com